# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र.प्रअचौ/मुख्यालय/सर्वसा/2032 दि.17.06.2016.

विषय:- लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून मनपा कर्मचाऱ्यांबाबत अग्रेषित करण्यात आलेल्या तक्रारी निकाली काढण्याबाबत अंमलात आणावयाची कार्यपध्दती.

--------------

असे निदर्शनास आले आहे की, जनतेकडून मनपा कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे संकिर्ण स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त होत असतात. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून काही तक्रारींची प्राथमिक स्तरावर शहानिशा करण्यात येते. परंतु त्यातील काही तक्रारी महापालिकेकडे चौकशीसाठी आणि योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या जातात.

तसेच काही प्रकरणी या तक्रारी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अभिलेखावरही न घेता परस्पर पुढील कार्यवाहीसाठी महापालिकेकडे अग्रेषित केल्या जातात. अशा तक्रारी बहुतांशी निनावी किंवा खोटया नावाने लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडे पाठविलेल्या असतात. निनावी तक्रारीं बाबत महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्र. शाकाप – 2015 / प्रक्र 5 /18 ( र व का) दि.25.02.2015 अन्वये परिपत्रक जारी केलेले आहे व त्यात निनावी स्वरुपाच्या तक्रारी प्रकरणी व तक्रारीतील आरोप असंबध्द (Vague) असल्यास अशा तक्रारी दप्तरी दाखल कराव्यात असे निर्देश दिलेले आहेत. तरी अशा तक्रारी संबंधीत खाते प्रमुखांच्या स्तरावर दप्तरी दाखल कराव्यात.

सदर बाबींचा विचार करुन लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी निकाली काढण्या बाबत पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत -

| अनु क्र. | लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडून प्राप्त तक्रारीचे स्वरुप | महापालिकेकडून करण्यात यावयाच्या कार्यवाहीचे स्वरुप |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रार अभिलेखावर न घेता परस्पर महापालिकेकडे वर्ग करणे व महापालिकेकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या तपशिलाची मागणी न करणे. | अशा तक्रारी खातेप्रमुखांच्या स्तरावर दप्तरी दाखल करण्यात याव्यात. |
| 2 | लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारीची शहानिशा केली परंतु लाच लुचपत विभागाकडून कारवाई अपेक्षित नसल्याने विभागीय चौकशीसाठी महापालिकेकडे वर्ग करण्यात येणे व अहवाल अपेक्षित असणे. | सदर प्रकरणी निदर्शनास आलेले गैरकृत्य संबंधित कर्मचाऱ्याच्या कर्तव्याशी निगडीत असल्यास -<br>1. सहा.अभियंता या श्रेणी पर्यंतच्या कर्मचाऱ्यांबाबत कार्य.अभियंता श्रेणीतील अधिकाऱ्यांनी चौकशी करुन |

J. 24639 (1)

| | | |
|---|---|---|
| | | सक्षम प्राधिकाऱ्यांना अहवाल सादर करुन कार्यवाही करणे<br>2. कार्य.अभियंता व त्यापेक्षा वरिष्ठ कर्मचाऱ्यां बाबत प्रमुख अभियंता / खाते प्रमुख श्रेणीतील अधिकाऱ्यांनी चौकशी करुन सक्षम प्राधिकाऱ्यांना अहवाल सादर करणे.<br>3. खाते प्रमुख श्रेणीतील कर्मचाऱ्यांबाबत उप आयुक्त श्रेणीतील अधिकाऱ्यांनी चौकशी करुन सक्षम प्राधिकाऱ्यांना अहवाल सादर करणे.<br>सदर कारवाई तक्रार प्राप्त झाल्यापासून 60 दिवसांत पूर्ण करणे व त्यानुसार महापालिका आयुक्तांना अहवाल सादर करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागास अवगत करणे. |

सर्व खाते प्रमुखांनी वरील निर्देशांची नोंद घेऊन लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडून प्राप्त तक्रारींबाबत वरील निर्देशांप्रमाणे कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| सही/-9.6.16 | सही/-9.6.16 | सही/-17.6.16 |
| रमेश दणाणे | सुधीर नाईक | अजोय मेहता |
| प्रमुख अधिकारी (चौकशी) | उप आयुक्त (सा.प्र.) | महापालिका आयुक्त |

क्रमांक.प्रअचौ/मुख्यालय/सर्वसा/2032
दिनांक.17.06.2016

प्रत: -------------------------------- यांना (अतिरिक्त ----- प्रतींसह). माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना.

22.6.16

उप प्रमुख अधिकारी (चौकशी) मुख्यालय

MS. CIR. 28. BMPP. 24689. 2016-17. 1000 copy.